महाराष्ट्र शासन

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,
Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /शिष्य./२०२५-२६/ 2884 दिनांक 31 JUL 2025

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय,अनुदानित्, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

**विषय:- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता, डीबीटी पोर्टलव्दारे विद्यार्थ्यांचे अर्ज मंजुरी करिता पाठविण्याबाबत.**

आपले सरकार महाडिबीटी पोर्टल (संकेतस्थळ : https://mahadbtmahait.gov.in) वर महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यापैकी खालील योजना तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येतात.

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना.
२) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना.
३ )उच्च व्यावसायिक व इयत्ता १२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना.

महाडिबीटी पोर्टलवर निर्देशित केल्यानुसार **शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता**, महाडिबीटी पोर्टलव्दारे विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज (नवीन /नुतनीकरण ) भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता आपल्या संस्थेमध्ये शिकत असलेल्या उपरोक्त योजनांसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांकडून डीबीटी पोर्टलवरील अर्ज (नवीन/नुतनीकरण) भरण्याबाबत संस्थास्तरावरुन विद्यार्थ्यांना सुचित करण्यात यावे. तसेच संस्था स्तरावर प्राप्त झालेले विद्यार्थ्यांचे अर्ज, संस्थेला दिलेल्या दोन्ही लॉगीन मधून संबंधित योजनांच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार काटेकोरपणे तपासणी करून अचुक पात्र असलेले अर्ज मंजूरीस्तव या कार्यालयास पाठविण्यात यावे.

(डॉ. मनोजकुमार भा. डायगव्हाणे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपुर.